## संक्षिप्त

### निसर्ग सहल

**ठाणे :** मुंबई, नवी मुंबई, ठाणे येथे पर्यावरण संवर्धनासाठी कार्यरत असणाऱ्या वनशक्ती संस्थेतर्फे दोन दिवसीय निसर्ग सहलीचे आयोजन करण्यात आले होते. या सहलीमध्ये शहापूर येथील सरळंबे गावातील जिल्हा परिषद शाळेमधील एकूण ५२ विद्यार्थी सहभागी झाले होते. वनशक्तीतर्फे आयोजन करण्यात आलेल्या सहलीमध्ये पक्षांची ओळख, पर्यावरणीय माहितीपट, खेळ, प्रश्नमंजुषा स्पर्धा, कागदी पिशवी तयार करणे कार्यशाळा, पर्यावरण संवर्धनासाठी आदिवासींची भूमिका, रोपटे लागवड, मातीकाम कार्यशाळा, कोकेडामा कार्यशाळा अशा विविध कार्यक्रम पार पडले. विद्यार्थ्यांमध्ये पक्षांबद्दल जागृती निर्माण व्हावी यासाठी ओळख पक्षांची या विषयावर सत्र घेण्यात आले.

घोडबंदर किल